# नवोपक्रम

विषय - इतिहास

2009-2010

# संस्कृतीचा तुलनात्मक अभ्यास

स्पर्धकाचे नाव :- सौ. संज्योत सुनिल उंडे

कमला निंबकर बालभवन,

फलटण.

# प्रकल्प निवडीमागील भूमिका

- भाषा विषय, कविता विद्यार्थ्यांच्या लक्षात राहतात. काही दृश्य साधनांद्वारे काही गोष्टी समजावून देता येतात. पण इतिहास विषयात घडून गेलेल्या घटना व त्याचा इ.स.पू ८ ते १५ चा कालावधी हा फक्त कल्पनेतूनच अनुभवू शकतो. याचा विचार करून विद्यार्थ्यांना कॅसेट, कात्रण, चित्रे यांचा वापर करून तो विषय ते लवकरात लवकर आत्मसात करतील यासाठी शिक्षकांनी चार भिंतीच्या आत शिकविण्यापेक्षा पाठ्यपुस्तकाबाह्य गोष्टीतून ते जास्त शिकतात. म्हणून त्यांच्या शिकण्याला प्रोत्साहन देणे.

- विद्यार्थ्यांची शिकण्याची उर्मी जागृत करून त्याला योग्य दिशा देणे. आज आपण २१ व्या शतकाकडे वाटचाल करतांना अध्ययन प्रभुत्वाची गरज आहे. याची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे व विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण शोधून त्याला त्याची जाणीव करून देणे हे शिक्षकांचे काम आहे.

प्रभुत्व अध्ययनाची विद्यार्थ्यांना लहान वयातच
सवय लावल्यास सामान्यातील सामान्य विद्यार्थीही
अनेक गोष्टी आत्मसात करू शकतो. या माध्यमातून
भारतीय, इजिप्त, ग्रीक संस्कृतीतील समाजजीवन,
व्यापार, धर्मकल्पना, राज्यव्यवस्था, आर्थिक
जीवन इत्यादी गोष्टींचा बारकाईने अभ्यास
करून त्यांचा विकास कसकसा होत गेला. किंवा
नाही हे पहात असतानाच विद्यार्थ्यांत विविध
संस्कृतीबद्दल आदर निर्माण करणे.

# उपक्रमाची उद्दिष्टये

१] विद्यार्थ्यांमध्ये प्रत्येक संस्कृतीबाबत आदर वाढविणे.
२] संस्कृती संस्कृतीचा अभ्यास करून भिन्नता व समानता ओळखणे.
३] आपली संस्कृती श्रेष्ठ इतरांच्या संस्कृती जाणण्यातील निरुत्साह दूर करणे.
४] विद्यार्थ्यांना स्वतःच्या क्षमतावर विश्वास ठेवण्यास प्रवृत्त करणे.
५] पाठ्यपुस्तकाव्यति रिक्त जास्त ज्ञान मिळविणे.
६] सर्व संस्कृतीतील तत्त्वज्ञानाबाबत जागरुकता वाढविणे.
७] विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देणे.
८] विद्यार्थ्यांनी समुहात काम करणे. स्वयंअध्ययन करणे.
९] वेगवेगळ्या संस्कृतीचे आकलन होणे.
१०] आनंददायी व स्वयंशिस्तीचे वातावरण ठेवणे.
११] विद्यार्थ्यांनी स्वयंनिरीक्षण करणे. विद्यार्थ्यांच्या

अंगी कामातील नियमितपणा, परिश्रम करण्याची क्षमता असे गुण वाढीस लावणे.

१२] विद्यार्थ्यांची जिज्ञासा, चौकसपणा, चिकित्सक वृत्ती आणि विश्लेषणात्मक दृष्टीकोन वाढीस लावणे.

१३] इतिहासाबद्दल प्रेम निर्माण करणे.

१४] विद्यार्थ्यांचे ज्ञानभांडार वाढविणे.

उदा- विश्वकोश हाताळणे, नकाशात स्थान शोधणे

१५] प्रत्येक संस्कृतीच्या काळातील समस्या जाणून घेणे.

१६] मिळालेल्या ज्ञानाचे आविष्करण करण्यास प्रवृत्त करणे.

# विषय-निवड

साधारणतः १४-१५ वर्षांची ही इयत्ता नववीतील विद्यार्थी नेमकं वाढीचं व जिज्ञासेच, अंगात प्रचंड उर्मी असलेलं वयं. सतत काहीतरी करणं, धडपडणं याच वयातचं इतिहास अध्ययनात भूतकाळाबरोबर वर्तमान-काळाची जाण आणि भविष्यकाळाची प्रेरणा। देणे महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांना मानवी जीवनावर परिणाम करणाऱ्या व जगाची संस्कृती समृद्ध करणाऱ्या महत्त्वाच्या घटना व व्यक्ती यांची स्थूलमानाने ओळख होणे गरजेचे आहे.

— या वयात विद्यार्थ्यांच्या जाणीवा हळूहळू विकसित होत असतात. ह्याच काळात मानवी संस्कृतीची जडणघडण व समाजाची एकता याची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये विकसित करणे गरजेचे आहे

विविध संस्कृतीच्या योगदानातून विकसित झालेला मानवी समाजाचा सांस्कृतिक वारसा जतन करण्याचे काम या भावी पिढीचे आहे. म्हणून

त्यांनी विविध संस्कृतीतील समन्वयामुळेच मानवाचा विकास झाला हे समजावून घेण्यास विद्यार्थ्यांना उद्युक्त करणे व त्यातूनच निकोप राष्ट्रीय एकात्मता धर्मनिरपेक्षता ह्या गोष्टी विद्यार्थ्यांच्या मनावर ठसविणे. प्रत्येक संस्कृतीचा आदर राखणे.

तसेच वर्तमानकाळातील घटनांचा चांगल्या आकलनासाठी भूतकाळाचा अन्वयार्थ लावणे.

इतिहास हा भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांच्यात सातत्याने चाललेला संवाद असतो. ही मूलभूत जाण ह्या उपक्रमातून विद्यार्थ्यांत निर्माण करणे.

आपला विद्यार्थी हा इतिहास नावाच्या एका विषयाचा अभ्यास करणारा केवळ एक निव्वळ परीक्षार्थी नाही तर तो वर्गामध्ये घडत असलेला उद्याचा नागरिक आहे. आणि स्पर्धेच्या युगात हा विद्यार्थी टिकला पाहिजे. या अफाट माहितीच्या परिस्फोटात त्याला आवश्यक ती

माहिती मिळविण्याची कला निर्माण झाली पाहिजे. व ती आत्मविश्वासाने इतरांपुढे मांडता आली पाहिजे. यासाठी हा उपक्रम करण्याचे ठरविले. व इ. नववीच्या वर्गातील २५ विद्यार्थी या उप-क्रमासाठी निवडले होते.

पाठ्यपुस्तक अभ्यासाबरोबरच अनेक साधनांचा उपयोग पूरक माहिती मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी करावा. जसे ग्रंथालयातील विविध संदर्भग्रंथ, जनरल नॉलेजची पुस्तके, विश्वकोश, दूरदर्शन व V.D.O कॅसेट, संगणक की ज्या साधनांद्वारे त्यांना अधिक ज्ञान मिळेल व अशा या स्पर्धेच्या युगात ते टिकून राहतील हा ही विषय निवडी-मागचा हेतू आहे.

# नियोजन

उपक्रमाचे नियोजन करतांना -

i] शाळेच्या मुख्याध्यापकांना माझ्या उपक्रमासंबंधी पूर्ण कल्पना देऊन त्यांची परवानगी घेणे

ii] मुख्याध्यापक, संबंधीत शिक्षक, ग्रंथपाल यांच्याशी चर्चा करणे.

iii] विद्यार्थ्यांची मानसिक तयारी करणे व या उपक्रमाचे महत्त्व पटवून देणे.

iv] उपक्रमासंबंधित V.D.O कॅसेट दाखविणे.

v] विद्यार्थ्यांना उपक्रमासंबंधी सर्व कल्पना देऊन विद्यार्थी कृती निश्चित करणे.

vi] नवोपक्रमाचे वेळापत्रक निश्चित करणे.

vii] विद्यार्थ्यांना विषय वाटून देणे.

# वेळापत्रक

संस्कृतीचा तुलनात्मक स्वयंअध्ययनातून अभ्यास या उप-क्रमासाठी इ. नववीचा वर्ग निवडला होता हा शैक्षणिक उपक्रम २००९-१० या वर्षात प्रथम सत्रात राबविला यासाठी साधारणतः दोन महिन्यांचा कालावधी लागला. या उपक्रमासाठी पाठ्यपुस्तकातील तीन पाठ निवडले होते. पारंपारिक पद्धतीने हे तीन पाठ वर्गात शिकविले. पारंपारिक पद्धतीने पहिल्या पाठास २ तास, दुसऱ्या पाठास २ तास व तिसऱ्या पाठास २ तास याप्रमाणे वेळ लागला. या तिन्ही पाठांवर आधारित पूर्व परीक्षा घेतली त्यासाठी २ तास लागले.

| | |
|---|---|
| ग्रुप स्टडी समजावून देऊन गट पाडणे | १ तास |
| तिन्ही प्रकरणांवर ग्रुपस्टडी करणे | ६ तास |
| प्रकल्प तयारी | ३ तास |
| सादरीकरण | २ तास |
| उत्तर परीक्षा | २ तास |

असे एकूण २२ तासिकांचा वेळ मिळाला. असे साधारणतः वेळापत्रक तयार केले. २० ऑगस्ट ते २६ सप्टेंबर या कालावधीत हा नवोपक्रम पूर्ण केला.

# निवडलेले पाठ

इयत्ता नववीच्या पाठ्यपुस्तकातील संस्कृतीवर अधारित तीन पाठ निवडले

पाठाचे नाव :- इजिप्तची संस्कृती

प्राचीन भारतीय संस्कृती

ग्रीक संस्कृती.

हे पाठ त्या त्या संस्कृतीतील समाजजीवन, राज्यव्यवस्था, धर्मकल्पना, आर्थिक जीवन, सांस्कृतिक जीवन यावर अधारित आहेत. या गोष्टीत त्यांनी कसा विकास केला या बाबतची माहितीस पूरक अधिक माहिती विद्यार्थ्यांनी मिळवावी. यासाठी त्यांना त्या त्या संस्कृती संबंधी V.D.O कॅसेट दाखविली.

विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या संस्कृतीबाबतची माहिती कोणत्या संदर्भग्रंथातून उपलब्ध होईल शक्यतो त्यांनी ते संदर्भग्रंथ अभ्यासून पूरक माहिती स्वतः शोधावी हा प्रयत्न होता.

एक - एक संस्कृती वर्गात पारंपारिक

पद्धतीने शिकवून त्यावर एक वर्गचाचणी घेतली असता पाहिजे तेवढी समाधानकारक चाचणी विद्यार्थ्यांनी सोडविली नाही. अपेक्षित यश विद्यार्थ्यांनी मिळविले नाही. त्यांनी स्वतःच या संस्कृतीचा अधिक सखोल अभ्यास करावा व अधिक चांगल्या रितीने ह्या संस्कृतीची जाण त्यांच्यात निर्माण व्हावी यासाठी उपक्रम हाती घेतांना हे तीन पाठ निवडले.

1] इजिप्त संस्कृती
2] भारतीय संस्कृती [हडप्पा व आर्य]
3] ग्रीक संस्कृती.

# शिक्षककृती

१] नवोपक्रमाबाबत मुख्याध्यापकांची परवानगी घेणे.

२] संबंधित विद्यार्थ्यांना नवोपक्रमाची माहिती देणे.

३] विद्यार्थ्यांची मानसिक तयारी करणे.

४] उपक्रमाचे महत्त्व पटवून देणे.

५] ग्रंथपालाची मदत व अनुमती मागणे.

६] नवोपक्रमाचे नियोजन विद्यार्थ्यांना समजावून देणे.

७] विद्यार्थ्यांना सतत प्रोत्साहन देणे. कौतुक करणे.

८] मार्गदर्शक म्हणून भूमिका पार पाडणे.

९] V.D.O कॅसेट हडप्पा संस्कृतीची दाखविणे.

१०] ग्रुपमध्ये विद्यार्थी योग्य काम करतात याकडे लक्ष ठेवणे. गोंधळ न करता एकमेकांच्या सहकार्याने काम करतात यावर सतत लक्ष ठेवणे.

११] विद्यार्थ्यांना हा प्रकल्प वर्गात सादरीकरण करावयाचे याची जाणिव देणे.

१२] सादरीकरणासाठी योग्य दिशा देणे.

१३] मानवी समाजाने जगात विविध ठिकाणी

भिन्न भिन्न कालखंडात केलेल्या प्रगतीची
विद्यार्थ्यांना ओळख व्हावी या दृष्टीने जास्तीत
जास्त अवांतर साहित्य उपलब्ध करून देणे.

# विद्यार्थी-कृती

1) आपला उपक्रम व्यवस्थीत समजावून घेणे.

2) ग्रुपमधील कामासंबंधी सर्व माहिती करुन घेणे व ग्रुपमधील आपली भूमिका समजून घेऊन विचारपूर्वक चर्चा करणे. आपापले मुद्यांचे आकलन करुन घेणे

3) प्रत्येकाने आपापली जबाबदारी स्वीकारणे.

4) ग्रुपमधील सर्व विद्यार्थ्यांना सहकार्य करणे.

5) अधिक माहितीसाठी ग्रंथालयातील संदर्भ साहित्याचा वापर करणे

6) आपले सर्व लिखाण एकत्रित करुन त्याचे ग्रुपमधील प्रत्येकाला आकलन झाले आहे की नाही हे पहाणे.

7) संबंधीत विषयाचे चित्रे, नकाशे काढणे.

8) मिळविलेल्या माहितीआधारे प्रकल्प तयार करणे.

9) आपल्या ग्रुपमध्ये झालेल्या पाठ्यांशाचे वर्गात कसे सादरीकरण करावयाचे याची पद्धती ठरविणे व सादरीकरण करणे.

10) सादरीकरणावेळी लक्ष देऊन त्याचे आकलन

करून घेणे.

११) मिळविलेल्या माहितीआधारे प्रकल्प तयार करणे

१२) प्रकल्पाचे वर्गात सादरीकरण करणे.

# कार्यवाही

१] हा उपक्रम सुरू करण्यापूर्वी मुख्याध्यापकांना या प्रकल्पाची माहिती दिली.

२] हा उपक्रम इ. नववीच्या वर्गात राबवायचा असल्याने इयत्ता नववीतील विद्यार्थ्यांना त्यांनी करावयाच्या कामाबद्दल पूर्ण माहिती दिली. व सर्व संकल्पना विद्यार्थ्यांना समजली की नाही याची खात्री केली.

३] हा उपक्रम करीत असतांना साधारण दोन हुशार दोन मध्यम व एखादा वर्गात मागे असलेला विद्यार्थी असे गट केले.

४] या प्रत्येक गटाला इजिप्त, प्राचीन भारतीय संस्कृती, ग्रीक संस्कृती या तिनही संस्कृतीतील धर्मकल्पना, आर्थिक जीवन, समाजव्यवस्था, राज्यव्यवस्था, सांस्कृतिक जीवन यांचा एक-एक भाग वाटून दिला. उदाहरणार्थ—

एका गटाला तिनही संस्कृतीची समाजव्यवस्थेचा तुलनात्मक अभ्यास याप्रमाणे पाच गट केले.

व एकेकाला एक-एक भाग वाटून दिला.
५] प्रत्येक गटासाठी एक ग्रुप लिडर नेमला.
६] प्रत्येक गटातील प्रत्येकाचे काम समजावून दिले.
७] ग्रुपमधील प्रत्येकाची भूमिका महत्त्वाची आहे हे समजावून दिले.
८] ग्रुपमध्ये काम करतांना शिस्त महत्त्वाची आहे हे समजावून देणे.
९] शाळेची एक माजी विद्यार्थिनी नादिया कुरेशी (M.A आर्किऑलॉजी) पुरातत्त्वशास्त्र शिकते आहे हे ऐकून तिच्याशी चर्चा केली व प्रश्न लिहून उत्तरे मागितली.
१०] सिन्धू संस्कृतीच्या एका एका भागाच्या तुलनात्मक अभ्यास करतांना विविध संदर्भ ग्रंथ गोळा केले, माहिती गोळा केली. चित्रे, नकाशे तयार केले व प्रकल्प तयार केला. हा प्रकल्प गटातील कोणताही विद्यार्थी पुढे उभा केला जाईल. प्रत्येकाला सहभाग द्यावा लागेल. त्यामुळे प्रत्येकाने तो भाग समजावून घेणे गरजेचे होते.

समस्या

सतत सतर्क रहावे लागत होते विद्यार्थ्यांना कोठे शंका येईल त्याचे तातडतोब शंकानिरसनासाठी सतत क्रियाशील रहावे लागत होते.

विद्यार्थ्यांना प्रकल्प करणे, लिहिणे आवडत होते पण त्याचे सादरीकरण कशाला ? आमचे प्रकल्प इतर गटागटातील मुले वाचतील. सुरुवातीला ही संकल्पना सादरीकरणाची रुजविणे अवघड गेले. पण स्टेज डेअरिंगचे महत्त्व व केलेल्या कामाच्या योग्य मूल्यमापनासाठी सादरीकरण किती महत्त्वाचे हे समजल्यावर हळूहळू त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला.

इतिहास विषयक पुस्तके शोधणे व त्यातून हवी ती माहिती परकन सापडणे अवघड. परंतु त्यासाठी आधीच ग्रंथपालांच्या साह्याने पुस्तके शोधून ठेवून ती आवश्यक पुस्तके विद्यार्थ्यांना पुरविली.

सादरीकरणाच्या वेळी गोंधळ होणार नाही
आपल्या ग्रुपचे इतरांनी समजावून घेणे महत्वाचे
ही संकल्पना रुजविणे, समजावून घेणे महत्वाचे.

# सादरीकरण

पहिल्या ग्रुपचा भाग होता समाजव्यवस्था ह्या टॉपिकचे सादरीकरण करीत असतांना विद्यार्थ्यांनी नकाशे, माहिती, वर्गफळा, चित्रे यांचा उपयोग करुन हा भाग सादर केला. विद्यार्थ्यांनी स्वत: नकाशे बनविले होते त्यांचा योग्य वापर करुन सादरीकरण केले. हे सादरीकरण करतांना सर्वच ग्रुपने खूप कष्ट घेऊन सादरीकरणाची आखणी केलेली दिसत होती.

अवांतर माहिती सांगतांना सर्व विद्यार्थ्यांना ती समजावी या दृष्टीने मधून मधून प्रश्नोत्तरे विचारत होती. काही विद्यार्थ्यांनी तर संगणक व इंटरनेटचा वापर करुन जास्तीत जास्त माहिती वर्गापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केलेला दिसत होता.

अशा पद्धतीने पहिल्या टॉपिकपासून शेवटच्या टॉपिकपर्यंत विद्यार्थ्यांत खूपच चांगले बदल जाणवले. त्यांचा आत्मविश्वास खूपच वाढला व सादरीकरणात हळूहळू सुधारणा होत होती. प्रत्येकाने

आपली महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. प्रत्येकजण मन लावून समजावून घेत होते. व प्रश्नही विचारीत होते. विद्यार्थ्यांच्या प्रश्नाला सादरीकरण कर्तीही योग्य मार्गाने उत्तरे देत होते. प्रत्येकाचे सादरीकरण चांगले व्हावे म्हणून धडपड चालू होती.

समाजजीवन, सांस्कृतिक जीवन, धर्मकल्पना, आर्थिक जीवन धर्मकल्पना या सर्वच टॉपिकवर सादरीकरण करताना विद्यार्थ्यांना अनेक गोष्टींचे कुतुहल जाणवले. पूर्वीच्या काळातील घटना जाणून घेण्यास विद्यार्थी उत्सुक होते. सादरीकरणावेळी विद्यार्थी त्यांच्या मनातील प्रश्नही विचारत होती. अथवा त्याबाबत बाकी विद्यार्थ्यांना जर काही जादा माहिती असेल तर ती सांगत होती. प्रत्येकाने या सादरीकरणाला उत्कृष्ठ प्रतिसाद दिला.

सादरीकरणावेळी कुठेही यत्किंचितही कंटाळवाणेपणा जाणवला नाही. प्रत्येक सादरीकरणानंतर काही प्रश्न मी ही विद्यार्थ्यांना विचारले. त्या प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांना देता येत होती. यावरून अत्यंत लक्षपूर्वक विद्यार्थी ऐकत होते.

# निरीक्षणे

१] प्रथम चाचणीतील गुण विद्यार्थ्यांना सांगितल्याने अत्यंत काळजीपूर्वक माहिती मिळवित होते.

२] सतत आलेल्या शंकांचे निरसन करून घेत होते.

३] विद्यार्थ्यांमध्ये काम करतांना दडपण जाणवत नव्हते.

४] विद्यार्थी आनंदाने व जिज्ञासापूर्वक माहिती मिळवित होते.

५] एकमेकांच्या सहकार्याने काम करीत होते.

६] दंगामस्ती न करता दुसऱ्यांचे म्हणणे ऐकून घेत होते.

७] जास्तीत जास्त माहिती मिळविण्यात मग्न होते.

८] इंटरनेटचा वापर करीत होते.

९] ग्रंथालयातील संदर्भग्रंथाचा भरपूर वापर करीत होते.

१०] जबाबदारीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होऊन मिळून मिसळून काम करीत होते.

११] चित्रे, नकाशे तन्मयतेने माहितीपूर्वक काढीत होते.

१२] सतत मिळविलेल्या माहितीवर चर्चा करीत होते.

१३] आलेल्या शंकांचे निरसन करून घेतांना त्यांच्याही मनात कोणते उत्तर आहे ते ही बोलून दाखवित होते.

१४) सादरीकरण करावयाचे असल्याने बोलण्याचे धाडस निर्माण झाले.

१५) प्रगती १-२ गुणांपासून १० ते १५ गुणांपर्यंत वाढली.

हा नवोपक्रम करताना असे निदर्शनास आले की, केवळ समृद्ध लायब्ररी किंवा इतर साधने उपलब्ध असतानाच हा नवोपक्रम होतो असे नाही तर आजकाल अगदी स्मार्ट सोबती सारख्या अंकातही पर्यटन स्थळ म्हणून अनेक देश त्यांची संस्कृती या बाबत माहिती येते. तसेच केवळ पुस्तकातील माहितीचीही तुलनात्मक दृष्टया चर्चा केली तरी भरपूर ज्ञान मिळू शकते. व विद्यार्थ्यांना तो भाग चटकन आकलन होतो.

# यशस्विता

१) विद्यार्थ्यांच्या वर्तनात अमुलाग्र बदल जाणवला.

२) जबाबदारीने प्रकल्प लिहून त्याचे वर्गात सादरीकरण केले.

३) धाडसी वृत्ती वाढली.

४) पुस्तका व्यतिरिक्त ज्ञान मिळविण्याची जिज्ञासा निर्माण झाली.

५) कात्रणे, नकाशे, चित्रे यांचा संग्रह करण्याची जाणीव निर्माण झाली.

६) नेतृत्वगुण, चिकाटी, जबाबदारीची जाणीव, ऐकून घेण्याची, जुळवून घेण्याची सामंजस्य वृत्ती वाढली.

७) गुण व व्यवस्थितपणात वाढ झाली.

८) इतरांच्या संस्कृतीबद्दल आदर निर्माण झाला.

९) धर्माधर्मातील कल्पना व्यवस्थित समजावून घेऊन कोणताही भेदभाव न करण्याची वृत्ती निर्माण झाली.

१०) विचारांच्या कक्षा रुंदावल्या, व्यापक दृष्टीकोन निर्माण झाला.